SHIVAJI
UNIVERSITY KOLHAPUR

Golden Jubilee Year 2019-20 of

# Department of Political Science

&

# Shivaji University Political Science Association

# Conference Prociding of Two Days National Seminar

&

37th Maharashtra Political Science & Public Administration Conference

# "Contemporary Issues in Political Science"

10th & 11th January 2020



Navjyot

ISSN - 2277 - 8063
International Interdisciplinary research Journal
(Humanities, Social Sciences, languages, Commerce & Management)

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 43 | डिजिटल समाजाच्या संदर्भात बदलते राजकारण | डॉ. नंदाजी सातपुते | 176-177 |
| 44 | भारतीय नागरिकत्व नावनोंदणी संघर्ष आणि : वास्तव | डॉ.गणेश गिरी | 178-181 |
| 45 | एक राष्ट्र एक चुनाव कि उपलब्धयॉं और चुनोतियॉं | डॉ.प्रा लक्षटे रत्नाकर बाबुराव | 182-184 |
| 46 | कलम ३७० : घटनात्मक तरतुदी | डॉ.सुधीर वाडेकर | 185-189 |
| 47 | लोकशाहीसमोर झुंडशाहीचे आव्हान | दत्तात्रय भानुदास जाधव | 190-194 |
| 48 | एक देश, एक निवडणुक! | प्रा.माधव डॉ. चोले | 195-198 |
| 49 | भारतातील आघाडीच्या राजकारणाची वाटचाल व विश्लेषण | प्राशरद बाबुराव सोनवणे | 199-203 |
| 50 | भारतीय लोकशाहीला नक्षलवादी चळवळीचे आव्हान | प्रा.डॉ.कैलाश बद्रीनाथ माटे | 204-205 |
| 51 | महाराष्ट्राच्या राजकारणातील नेतृत्वांचे बदलते प्रवाह | नवनाथ वि. नागरे | 206-207 |
| 52 | भारतातील सहभागात्मक लोकशाही प्रक्रिया | प्रा.डॉ.आर.बी.वनारसे | 208-216 |
| 53 | डिजिटल समाजाच्या संदर्भात बदलते राजकारण | प्रा.चैतन्य कांबळे<br>प्रा.सुजाता पाटील | 217-218 |
| 54 | भारताची लोकशाही खरोखरच घसरत आहे का? | डॉ.बाळ कांबळे<br>सहा.प्रा.प्राजक्ता ठुबे | 219-223 |
| **POLITICAL THOUGHT AND ITS CONTEMPORARY RELEVANCE** | | | |
| 55 | Non Brahmin Feminist Perspective : Study Of Contributions Of Mahatma Phule And Tarabai Shinde | Mrs. Neha Nitin Wadekar, | 224-228 |
| 56 | Role Of Satyagrah In Democracy | Prof.Promod J. Patil | 229-233 |
| 57 | Gandhi And Gloalization | Dr.Rajendra S. Korde | 334-241 |
| 58 | Relevance Of Gandhian Philosophy In The 21st Century | Sunil Kavade<br>Firoj Shaikh | 242-<br>246- |
| 59 | Relevance Of Gandhian And Post Gandhian Thoughts | Dr. Suresh M. Devare | 247-251 |
| 60 | Gandhian Principles The 21st Century | Mr. P. S. Auti | 252-254 |
| 61 | Democratic Thought Of Mahatma Gandhi | Dr. Avinash V.Salve | 255-257 |
| 62 | The Concept Of Neo-Gandhian Thoughts About Sarvodaya | DR. R. K. KALE | 258-261 |
| 63 | Relevance Of Mahatma Gandhi's Ideology In The Present Scenario | Prof. Sanjay M. Mohade | 262-264 |
| 64 | The Relevance Of Gandhian Thought | Dr.Mahadev Gavhane<br>Prof. Dnyaneshwar Bansode | 265-267 |
| 65 | Contribution Of Gandhian Thoughts To Rural Development | Dr.Santosh S. Kolhe | 268-270 |
| 66 | Relevance Of Gandhian And Post Gandhian Thought | Dr. A. D. Jadhao | 271-273 |


Scanned with CamScanner

# एक देश,एक निवडणूक!

प्रा.डॉ.माधव चोले
राज्यशास्त्र विभाग,देगलूर महाविद्यालय, देगलूर

सध्याच्या रालोआ सरकारने भारतीय निवडणूकप्रक्रियेत "एक राष्ट्र एक निवडणूक" ही पध्दती स्वीकारण्याच्या हालचाली सुरु केलेल्याआहेत. 19 जुन 2019 रोजी झालेल्या सर्वपक्षीयबैठकीमध्ये "एक राष्ट्र एक निवडणूक" या पध्दतीच्याप्रस्तावावर प्राधान्याने चर्चा घडवून आणण्याच्या कृतीमधून भाजपा सरकारचा हेतू स्पष्टझालेला आहे.त्यामुळे सम-सामायिक भारतीय राजकियप्रक्रियेत "एक राष्ट्र एक निवडणूक" पध्दतीचा चिकित्सक अभ्यास करण्याचाप्रयत्न या शोध निबंधामध्ये केलेला आहे.प्रस्तुत लेखात ही पध्दती स्विकारण्याचा सरकारचाकाय? उद्देश आहे.यापध्दतीच्यानिवडणूक प्रक्रियेला काय फायदे होतील ? या पध्दतीवर राजकिय पक्षांच्या भुमिका काय आहेत ? भारतीय संविधानात्मक लोकशाही आणि संघराज्यावर काय ? परिणाम होईल.या पध्दतीच्या मर्यादा काय ? आहेत.इत्यादी बाबींचा अभ्यास खालील प्रमाणे केलेला आहे.

**संविधानात्मक स्थान :-**

भारत हा एक जगातील मोठ्या लोकसंख्येचे लोकशाहीराष्ट्र आहे.लोकशाहीत दोन संस्था महत्त्वाच्याअसतात.एक जनतेचे सत्ता अजमावणारी आणि निर्माणकरणारी निवडणूक आयोग तरदुसरी भारतीय लोकांचेवर्तन आणि राजकिय व्यवस्थेची प्रक्रिया संविधानानुसार पार पाडते की नाही याचा अर्थ / अन्वयार्थ लावणारी न्याय व्यवस्था संविधानाच्या 15 व्या भागात अनुच्छेद 324 ते 329 अंतर्गत निवडणूक आयोगाने तरतुद केलेली आहे.त्यानुसार निवडणूक आयोग स्वतंत्र, निपक्षपाती, राजकिय प्रभावापासून मुक्त वकार्यपालिकेच्या हस्तक्षेपापासून मुक्त असलेली अखिल भारतीय स्तरावरील एक स्वायत्त संस्थाआहे.संविधानाच्या अमंल बजावणीपासून 1989 पर्यंतनिवडणूक आयोग एक सदस्यीय होता. आता मात्रा 1989 नंतर निवडणूक आयोग त्रिसदस्यीय करण्यातआलेला आहे.मुख्य निवडणूक आयुक्त आणि सहआयुक्तयांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.त्यांच्यासेवाशर्ती ह्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे असतात.त्यांच्या सेवाशर्ती ह्या सर्वोच्च न्यायालयाच्यान्यायाधीशाप्रमाणे असतात.

खर तर भारतासारख्या विक्राची सामाजिक आणि आर्थिकविषमता असणाऱ्या देशात संविधानात्मक लोकशाहीचा प्रयोग नवा होता.भारतीय लोकांना विषमतापूर्ण मूल्यांच्या वर्तनाचीसवय अंगवळणी पडलेली होती.अशा परिस्थितीत जनतेचीसंमती अजमावणारी लोकशाही निवडणूकीवर आधारित स्वीकारुन पुढे चालवणे मोठे अवघड होते.तरी सुध्दा निवडणूक आयोगाने ती जबाबदारी पार पाडली.निवडणूक ह्या शांततापूर्णमुक्त वातावरणात होणे आवश्यकआहे.मात्र गेल्या सत्तर वर्षात भारतीय निवडणूकप्रक्रिया अनेक समस्यांनी ग्रासलेली आहे.निवडणूकीतजात-जमातीचा जनधारासाठी वापर करणे आणि जातीगत अस्मिता वाढीस लावणे, मोठ्या प्रमाणातकाळ्या पैशाचा वापर करणे, त्यासाठी सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे चक्र नित्यनियमानेअविरतपणे चालू आहे.अपक्षांची वाढती संख्या, निवडणूक अधिकाऱ्यावर राजकिय दबाव, त्याचप्रमाणे मुख्य निवडणूक आयुक्तांची भुमिका वारंवारवादाच्या भोवऱ्यात सापडल्याचे पुरावे पुढे आलेले आहेत.

वरील निवडणूक प्रक्रियेतील समस्यांचे निराकरण करण्यासाठीअनेक समिती, आयोग निर्माण करुन त्या सोडवण्याचा प्रयत्न झालेला आहे.

**एक देश एक निवडणूक पध्दतीचादावा :-(भाजपाचा दावा)**

19 जुन 2019 रोजी झालेल्या सर्वपक्षीयबैठकीत भाजपाने 'एक देश एक निवडणूक' ही पद्धती चर्चेसाठी पुढे ठेवली.या पद्धतीत लोकसभासाठी राज्यांच्या विधानसभा निवडणूकाएकत्रित घ्याव्यात अशी संकल्पना मांडण्यात आली.याला राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील घटकपक्षांनी व मोजक्या प्रादेशिक पक्षांनीसहमती दर्शविल्याचे दिसते.विरोधी पक्षांनीमात्र या संकल्पनेचा संविधानात्मक लोकशाही व संघराज्यवाद यांच्यावर अशा



Scanned with CamScanner

निवडणूकांचावाईट परिणाम होतो असा युक्तीवाद केलेला आहे.त्यामुळे या विषयावर व्यापक चर्चाविमर्श होण्याची व काळजीपूर्वक विचार करण्याचीगरज आहे.

खर तर ही पध्दती ज्या राष्ट्रांचा आकारछोटा, आहे, एक समान इतिहाससंस्कृती आहे.तसेच एक अथवा द्विपक्षपध्दती आहे.अशा राष्ट्रात ही पध्दती यशस्वी झालेली आहे.युरोपातील छोट्या राष्ट्रात ही पध्दती दिसून येते.भारतासारख्या बहुसांस्कृतिक, खंडप्राय आणि बहुपक्षपध्दतीअसणाऱ्या देशात अशक्यप्राय दिसते.

एकत्रित निवडणूक घेण्याची संकल्पना नवीननाही.निवडणूक आयोगाने 1982 साली आणि कायदाआयोगाने 1999 साली ही संकल्पना मांडली होती.पण अलीकडे नीती आयोगाच्या सदस्यांनी मांडलेला चर्चानिबंध व कायदा आयोगाने तयारकेलेला अहवाल, यामुळे या मुद्याला जोर मिळालेला आहे.शिवाय पंतप्रधानांनी आपल्या भाषणामधून या विषयाचीमांडणी प्रभावीपणे केलेली आहे.या संकल्पनेनेमुख्यत्त्वाने निवडणुकीच्या प्रक्रियेत सुलभता आणि कार्यक्षमता वाढेल तसेच आर्थिक खर्चहीकमी होईल या युक्तीवादाद्वारे आधार पुरवला जातो.एकत्रीत निवडणूका घेतल्या तर वारंवार होणाऱ्या निवडणूकांवरचा खर्च कमी होईल.अशा वारंवार होणाऱ्या निवडणूकामुळे लोकांचा वेळवाचेल, कर्मचाऱ्यांचा वेळ वाचेल, असाही युक्तीवाद पुढे केला जातो.मात्र संविधानात्मक तत्त्व आणि लोकशाही मूल्ये यांचाआदर या पध्दतीत दिसून येत नाही.एकत्रित निवडणूकाकायम राहावयाच्या असतील तर सरकारचा कार्यकाळ निश्चित ठेवणारी तरतुद करावी लागेल.

**संविधानात्मक लोकशाहीआणि संघराज्यवाद :-**

संविधानात्मक लोकशाही आणि संघराज्यवादयांच्यावर अशा निवडणूक पध्दतीचा विपरित परिणाम होईल. असा युक्तीवाद विरोधी पक्षांनी केला आहे.या युक्तीवादात तथ्यताही दिसते.संविधानकारांनी भारताची बहुसांस्कृतिकता लक्षातघेवून संघराज्याची रचना स्वीकारलेली आहे.संविधानातत्या-त्या राज्याची भाषा, संस्कृतीला स्थान दिलेले आहे.म्हणजेच एकाचवेळी देशाची एकात्मता आणि बहुसांस्कृतिकतायांच्यात मेळ घालून जपण्याचा प्रयत्न केलेला आहे.त्या-त्या राज्यांच्या प्रादेशिक विकासांच्या मागण्या, पुर्ण केलेल्या आहेत.विशेषता उत्तरपुर्वेकडील राज्यांच्या विकासांच्यामागण्या पुर्ण कराव्या लागल्या आहेत.अशा अनेकराज्यातील विधानसभा निवडणूकांचा कार्यकाल मागे-पुढे आहे.तो एकत्रित केला तरी, राष्ट्रपती राजवट, आघाडी सरकारमधील अस्थिरता या कारणांने परत क्रम चुकतो.तो परत एकत्रित करणे म्हणजे संविधानात्मक लोकशाही आणि संघराज्याच्या संरचनेलाधोका संभवतो.

संविधानकारांनी संघराज्याचे स्वरुप सर्वसामान्यकाळात संघराज्याचे तर संकटकाळात केंद्रीकृत संघराज्य स्वीकारले आहे.त्यामुळे भारतीय संघराज्य रचनेत काळानुसार बदल झालेलाआहे.प्रत्यक्ष व्यवहारात भारतीय संघराज्याचेस्वरुप पक्षपध्दतीच्या स्वरुपावरुन बदले आहे.जेव्हा राजकिय व्यवस्थेत केंद्र आणि राज्यात एकाच राजकिय पक्षांचे सरकार असते.तेंव्हा पक्षांच्या दृष्टीने एक पक्षपध्दती आणिसंघराज्याच्या दृष्टीने केंद्रीकृत संघराज्य असते.अशा काळात एक निवडणूक ही पध्दती यशस्वी होवू शकते.कारण दोन्ही स्तरावरील सरकारे एकाच पक्षाची असतात.पण संसदिय शासनात केंव्हाही राजकिय अस्थिरता येवूशकते.आणि निवडणूका होवू शकतात.ही मर्यादा आहे.मात्र भारतीय संघराज्यात 1970 नंतरच्या काळात प्रादेशिकपक्षांचा उदय आणि राष्ट्रीय काँग्रेस पक्षांचा बरचेवर होत गेलेला ऱ्हास यामुळे, बहुपक्षपध्दतीचेस्वरुप प्राप्त झाले.अर्थात केंद्र आणि राज्यातस्पर्धात्मक पक्षपध्दती, आणि सौदेबाजी संघराज्य अवतरले त्यामुळे केंद्र-राज्यात विभिन्नपक्षांची सरकारे भारतीय राजकारणात यायला लागली.त्यातच केंद्राने राज्य आणि-बाणी घोषित केल्यास, तसेच राज्यातील संयुक्त मिश्रसरकारे विभिन्न कारणांने अस्थिर होतात.अशापरिस्थितीत एकत्रित निवडणूक पध्दती राबविणे अशक्यप्राय होते.

**आघाड्यांच्या राजकारणातीलअस्थिरता :-**

1977 ते 2014 पर्यंतच्या भारतीय राजकारणातआघाड्यांची सरकारे आलेली दिसतात.याला फक्त 1991 ते 1995 चा पी.व्ही. नरसिंगरावचा काळ अपवाद आहे.कारण काँग्रेसला शासन निर्माण करण्याइतपत स्पष्टबहुमत होते. 1996 नंतरच्या सार्वजनिक निवडणूकीतशासन निर्माण करण्याइतपत स्पष्ट बहुमत कोणत्याच पक्षाला न मिळाल्याने,



Scanned with CamScanner

कोणत्याही पक्षालाराष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या सहकार्याने त्यांच्या कांही शर्ती, प्रस्ताव, अमान्य करुन आघाड्यांची सरकारे निर्माण करण्याची प्रक्रिया सुरु झाली.असे संयुक्त सरकारे निर्माण होण्याची कारण- बहुपक्षपध्दतीचेस्वरुप, एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत नाही, प्रादेशिक पक्षांचा वाढता प्रभाव, नेतृत्वामध्येस्पर्धा, पक्षबदलाची प्रवृत्ती, पक्षांतर्गत गटबाजी, या कारणांनी भारतीय राजकारणातआघाडी सरकारे अपरिहार्य बनली.अशा आघाडी सरकारमध्येपाठिंबा काढून घेणे, आणि अविश्वास ठराव या कारणांनी वारंवार केंद्रीय राजकारणात आणिराज्य राजकारणात सरकारे अस्थिर झालेली दिसतात.त्यामुळे वारंवार निवडणूकांना सामोरे जावे लागते.त्यामुळे एक निवडणूक पध्दत वास्तवात येणे अशक्यप्रायदिसते. 1977 मोरारजी देसाईचे सरकार, त्यानंतर 1989 ला विश्वनाथ प्रतापसिंगाचे, 1990 ला चंद्रशेखर यांचे सरकार, पुढे 1996 च्या सार्वजनिकनिवडणूकीत भाजपा मोठा पक्ष म्हणून पुढे आला.त्यामूळे अटल बिहारी वाजपेयीचे सरकार सत्तारुढ झाले पण 13 दिवसात बहुमत सिध्दन करताच कोसळले.त्यानंतर 1996 ला इंदिराकाँग्रेसचेबाहेरला पाठिंबा असलेले संयुक्त मोर्चाचे एच.डी.देवेगौडाचे सरकार अस्तित्वात आले.तेही अल्पजिवी ठरले 1997 ला इंद्रकुमार गुजरालचेआघाडी सरकार निर्माण झाले.पण काँग्रेसने पाठिंबाकाढल्याने पडले. 1998 ला सार्वजनिक निवडणूकाझाल्या.या निवडणूकीत भाजपाला सर्वात जास्तजागा मिळाल्या पण लोकसभेची स्थिती त्रिशंकु बनली होती.वाजपेयीच्या नेतृत्वाखाली भाजपाने शासनाची निर्मितीकेली.पण हे सरकार 13 महिने राहिले, जयललितानेपाठिंबा काढल्याने पडले.अर्थात या सर्व आघाडीशासनात प्रादेशिक पक्षांची भुमिका महत्त्वाची आणि निर्णायक बणलेली आहे.ज्या शर्ती, मान्य करुन प्रादेशिक पक्षांची भुमिकामहत्त्वाची आणि निर्णायक बणलेली आहे.ज्याशर्ती, मान्य करुन प्रादेशिक पक्षांनी पाठिंबा दिलेला असतो.त्या जर पूर्ण झाल्या नाहीत तर पाठिंबा काढण्याचीधमकी दिली जाते आणि वस्तुस्थितीत पाठिंबा काढलाही जातो.त्यामुळे आघाडी सरकारे अस्थिर होतात.अशा कारणांनी एक निवडणूक पध्दत आघाडी शासनात अपयशीठरते.सध्या जरी केंद्रात एकाच पक्षांच्यास्पष्ट बहुमताचे सरकार असले तरी राज्यात आघाडी सरकारे आहेत.राज्यात सुध्दा उदा.गोव्यात 1990 ते 2005 या पंधरावर्षाच्या काळात 14 वेळा सत्तांतर झालेले आहे.असेच झारखंडमध्ये आतापर्यंत 9 वेळा सत्तांतर झालेले आहे.आघाडी सरकारमध्ये गटातटांच्या, हितसंबंधाच्या राजकारणामुळेराजकिय अस्थिरता निर्माण होत असते मणिपूर, नागालँड, मेझाराम या छोट्या राज्यात सारखीअस्थिरता निर्माण होत असते.त्यामुळे वारंवारनिवडणूकीला सामोरे जावे लागते.अशा परिस्थितीतएक निवडणूक पध्दत अशक्यप्राय दिसते.

**राष्ट्रपती राजवट :-**

संविधानानुसार देशाच्या संकटकालीन परिस्थितीचेनिवारण करण्यासाठी राष्ट्रपतीला तीन प्रकारचे आणि-बाणी विषयक अधिकार देण्यात आले आहेत.युध्द, बाह्य आक्रमण आणि सशस्त्र विद्रोह निर्माणझाल्यास राष्ट्रीय आणी-बाणी कलम 352, घटक राज्यात घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यासराज्य आणीबाणी कलम 356, देशाची आर्थिकघडीविस्कटल्यास आर्थिक आणी-बाणीचीतरतूद आहे.

कलम 352 नुसार आतापर्यंत तीन वेळ राष्ट्रीयआणी-बाणी घोषित करण्यात आलेली होती.पहिल्यांदा 26 आक्टोबर 1962 रोजी चीनच्या भारत आक्रमणाच्या वेळी ही आणी-बाणी 1968 पर्यंत होती.दुसऱ्यांदा 1971 च्या पाकिस्तान युध्दांच्या वेळीतर तिसऱ्यांदा 25 जुन 1975 ला राष्ट्रीय आणी-बाणी घोषित केली. ही सत्ता आणी-बाणी 21 मार्च 1977 पर्यंत होती.अर्थात या आणीबाणीमुळेसंपूर्ण देशात राष्ट्रपती राजवट असते.सर्वसरकारचा कारभार राष्ट्रपती अधिकाराद्वारे केंद्रीत असतो.एकत्र निवडणूक पध्दत अशा राष्ट्रपती राजवटीमुळेक्रम मागे पुढे होतो.तसेच राज्यात राष्ट्रपतीराजवट वारंवार लागू करावे लागल्याने लोकसभा आणि विधानसभा एकत्र निवडणूक घेण्याच्यापध्दती आमलात येणे अशक्यप्राय आहे.आतापर्यंतजवळपास 100 वेळा राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केलेली आहे.भविष्यकाळात कोणत्याही राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केल्यास निवडणूकांचा क्रम एकत्र होत नाही.केंद्रात आणि राज्यात विभिन्न पक्षांची सरकारे आल्यास केंद्रातील सत्ताधारीपक्ष राष्ट्रपती राजवटीचा आपल्या विरोधी पक्षांचे सरकार बरखास्थ करण्यास सत्तेचा दुरुपयोगकरत असतो हा आतापर्यंतचा इतिहास आहे.



Scanned with CamScanner

एकत्र निवडणूक पध्दतीचा पर्याय भारतासारख्याबहुसांस्कृतिक आणि संघराज्यशासनपध्दती असणाऱ्या देशाला अशक्यप्राय दिसते.ही संकल्पना अमलात आणतांना अनेक विधिमंडळाचा कार्यकालपूर्ण होण्या अगोदरच समाप्त करावा लागेल.म्हणजेलोकशाही जनाधाराचा अपमान होईल.शिवाय एकत्रितनिवडणूकीमुळे विशेषता पुसली जाण्याची जास्त शक्यता आहे.आणि केंद्रीय पूर्वगृह दृढ होण्याचा धोका आहे.विशेषत: प्रचंड संसाधनांचे केंद्रीकरण व कथनाचंनियंत्रण एकाच पक्षाकडे जाण्याचा धोका आहे.उलट भिन्न वेळा होणाऱ्या निवडणूकामुळे केंद्र सरकारला स्वत:ची लोकविरोधी धोरणदुरुस्त करण आणि जनतेच्या मागण्याकडे लक्ष देण भाग पडण्याची शक्यता वाढते.शिवाय संसदेबाहेरची लोक आंदोलन व चळवळी यांच्यासोबतचविविध राज्यामधील निवडणूकामुळे लोकांच्या या कामकाजाच्या अभिव्यक्तीला अवकाश मिळतोआणि हा अवकाश लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असतो.

**संदर्भसुची :-**


1) सुहास पळशीकर, मे 2009, भारताच्या राजकारणाचाताळेबंद, मराठी वाचन साहित्य मालिका क्र.1 पेज क्रमांक 35, 39, 70, 72, 77.

2) सुहास पळशीकर, मे 2009, समकालीन भारतीय राजकारणाचेविश्लेषण, मराठी वाचन साहित्य मालिका क्र.2, पेज क्र. 73, 77.

3) सुहास पळशीकर, राजकारणाचा ताळेबंद (भारतीयलोकशाहीची वाटचाल), 31 डिसेंबर 2013, साधना प्रकाशन, 76, 77, 78, 107.

4) माधव गोडबोले, मे 2012, भारताच्या संसदियलोकशाहीची आग्निपरिक्षा पेज क्रं., 318, 319.

5) ☐डब्ल्युची पान, एकत्रित निवडणूका वि. उत्तरदायित्व, 16 ते 31 जुलै 2019, परिवर्तनाचे वाटसरु, पृष्ठ क्र.10.

6) टिपा – देगलूर महाविद्यालयातील स्टॉफ रुममध्ये होणाऱ्या चर्चातील मुद्दे.




Scanned with CamScanner